नियमित फौ. ख. क्र.४७/२०२३
सरकार -वि.- प्रशांत मेश्राम
नि.क्र. १४.

## सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - प्रविण यशवंतराव जाधव,
वय ४३ वर्षे, व्यवसाय – पो.ह. ब.क्र. ९२४,
राहणार – पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक २५.०५.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गुन्हा क्रमांक २२२/२०२३ नोंद झाला होता. त्याचा तपास माझ्याकडे आला. प्राथमिक तपास ए.पी.आय. गिरासे यांनी केले होते. त्यांच्याकडून प्राथमिक तपासाचे दस्त हस्तगत केले. पुढील तपासादरम्यान मी तहसीलदारांना रेती मोजणीकरिता पत्र दिले. आता मला दाखविलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते. त्यानंतर मी प्रादेशीक परिवहन कार्यालय येथे वाहनावर कारवाईकरिता पत्र दिले. आता मला दाखविलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. त्यानंतर मी वाहनाचे वजन करुन घेतले व तसा अहवाल दाखल केला. आता मला दाखविलेला अहवाल तोच आहे. त्यास **आर्टिकल 'अ'** देण्यात येते. साक्षीदारांचे बयान घेतले व तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले.
सरतपास संपला.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.१५ प्रमाणे तहसीलदारांना पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.१६ प्रमाणे आर.टी.ओ.ला पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविले नाही. हे

**नियमित फौ. ख. क्र.४७/२०२३**
**सरकार -वि.- प्रशांत मेश्राम**
**नि.क्र. १४.**

म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १२.०३.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.